# पिंपरी चिंचवड महानगरपालिका

## औद्योगिक प्रशिक्षण विभाग

पिंपरी – ४११ ०१८

## जाहिर प्रकटन

महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभाग यांचेमार्फत वेळोवेळी सूचना निर्गमित होत असतात. त्याअनुषंगाने औद्योगिक प्रशिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या औद्यौगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी व औद्यौगिक प्रशिक्षण संस्था, कासारवाडी या संस्थामार्फत राज्य व केंद्रस्तरीय योजना तसेच विविध उपक्रम राबविण्यात येतात तसेच प्रशिक्षणार्थीसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या विविध व्यापक संधी निर्माण करणे, कालानुरुप बदलणा-या तंत्रज्ञान/ कौशल्यास अनुसरुन आवश्यक कौशल्यवृध्दीकरीता राज्यात **"कौशल्य श्रेणी वर्धन धोरण"** राबविणेकामी विभागात सल्लागाराची आवश्यकता भासते. या वस्तुस्थितीचा विचार करता औद्योगिक क्षेत्रातील तज्ञ यांची विभागाकरीता **"सल्लागार (Consultant)"** म्हणून नेमणूक करणे आवश्यक आहे. याकरिता काम करणा-या तज्ञ सल्लागार संस्थेची नियुक्ती करणे आवश्यक आहे. याविषयाची सविस्तर जाहिरात पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येत आहे.

त्याकरीता इच्छुक संस्थेची असणारी अर्हता व इतर आवश्यक अर्टी-शर्ती/ निकष याबाबत सविस्तर माहिती महानगरपालिकेच्या www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर होमपेजवर व्यवसाय → निविदा → निविदा पहा या मेनूमध्ये दि.२६/०२/२०२५ पासून पाहण्यास उपलब्ध होईल. इच्छुक संस्थांनी मनपाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द केलेल्या सविस्तर माहितीच्या अनुषंगाने त्यांचेकडील सर्व माहिती आवश्यक ती कागदपत्रे, पुरावे, अनुभवाचे दाखले, नोंदणी प्रमाणपत्र एका सिलबंद पाकीटात (पाकीट क्रमांक-१) व दरपत्रक (प्रपत्र – अ) दुस-या सिलबंद पाकीटात (पाकीट क्रमांक-२) अंतिम दिनांकापूर्वी वेळेमध्ये मा. प्राचार्य, औद्यौगिक प्रशिक्षण विभाग, अमृतेश्वर कॉलनी शेजारी, मोरवाडी, पिंपरी - १८. यांचे नावे दि.१३/०३/२०२५ रोजी दुपारी ३.०० वा. पर्यंत टपालाने पोहचतील अथवा समक्ष बंद पाकिटात सादर करावेत. मुदतीत प्राप्त न झालेले व अर्धवट असलेले प्रस्ताव यांचा कोणताही विचार केला जाणार नाही, याची नोंद घेण्यात यावी.

(चंद्रकांत इंदलकर)
अति. आयुक्त (३)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८

क्र. औप्रवि/०५/कावि/१५३/२०२५
दि. २५/०२/२०२५

## कालानुरुप बदलणा-या तंत्रज्ञान व कौशल्यास अनुसरुन औद्योगिक प्रशिक्षण विभागात कौशल्यवृध्दी करण्याकरीता सल्लागार संस्थेची नियुक्ती करणेकामी अर्हताधारक इच्छुक संस्थाकडून अर्ज मागविणेबाबत सविस्तर माहिती

औद्योगिक प्रशिक्षण विभागाच्या अंतर्गत असलेल्या औद्यौगिक प्रशिक्षण संस्था, मोरवाडी व औद्यौगिक प्रशिक्षण संस्था, कासारवाडी या संस्थामार्फत राज्य व केंद्रस्तरीय योजना तसेच विविध उपक्रम राबविण्यात येतात तसेच प्रशिक्षणार्थीसाठी रोजगार व स्वयंरोजगाराच्या विविध व्यापक संधी निर्माण करणे, कालानुरुप बदलणा-या तंत्रज्ञान/ कौशल्यास अनुसरुन आवश्यक कौशल्यवृध्दीकरीता "कौशल्य श्रेणी वर्धन धोरण" राबविणेकामी "सल्लागार (Consultant)" म्हणून तज्ञ सल्लागार संस्थेची नियुक्ती करणे आवश्यक आहे.

प्रस्ताव स्विकारण्याचा कालावधी - दि.२६/०२/२०२५ ते दि.१३/०३/२०२५ पर्यंत

अंतिम दिनांक व वेळ - दि.१३/०३/२०२५ दुपारी ३.०० पर्यंत

इच्छुक संस्थेकडून प्राप्त झालेले प्रस्ताव मंजूर अथवा नामंजूर करण्याचा अधिकार मा. अति. आयुक्त (३), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-१८. यांनी स्वत:कडे राखून ठेवला आहे.

❖ इच्छुक संस्थांनी खालील निकष पूर्ण करणे आवश्यक आहे:

1. इच्छुक संस्था नोंदणीकृत – मान्यताप्राप्त असाव्यात, त्याच्या पुराव्यार्थ संस्थेने नोंदणी प्रमाणपत्राच्या प्रति सोबत सादर करणे आवश्यक राहील.
2. या क्षेत्रातील राष्ट्रीय मानांकन (accreditation) प्राप्त असल्यास त्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करावे.
3. सल्लागार संस्था म्हणून काम केले असल्याचे अनुभव प्रमाणपत्र, पुरावे सादर करावे.
4. कौशल्यवृद्धी, व्यक्तिमत्व विकास, इ. च्या अंमलबजावणीसाठी तांत्रिक व अतांत्रिक संस्थाशी सामंजस्य करार (MoU) केलेले असल्याचे पुरावे सादर करावे.
5. सामाजिक दायित्व निधी (Corporate Social Responsibility-CSR) व स्वेच्छा देणगी (Voluntary Donation-VD) अंतर्गत विविध उद्योजक / कॉर्पोरेट यांचेकडून संस्थेसाठी निधी, प्रोजेक्ट इ. प्राप्त करुन घेण्यासाठी आवश्यक ती सर्व कार्यवाही करणे.
6. सामाजिक दायित्व निधी (CSR) व स्वेच्छा देणगी (VD) अंतर्गत विविध उद्योजक / कॉर्पोरेट यांचेकडून प्राप्त झालेल्या मदतीच्या माध्यमातून संस्थेमध्ये कौशल्य विकास, कौशल्य विकास प्रकल्प, रोजगार निर्मिती कार्यक्रम, नाविन्यता, Enhancement, उद्योजकता, अद्ययावत तांत्रिक कौशल्य कोर्स, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संदर्भातील विविध उपक्रमांची अंमलबजावणी करुन समन्वय आणि देखरेख इ. कामकाज करणे. तसेच संस्थेतील Lab/Classroom/Workshop विकसित करणे.
7. कॉर्पोरेट संस्थांमधील तज्ञ व्यक्तीद्वारे ज्ञान, कौशल्य सामायिकरण (Knowledge Sharing), Industry Partnership Development इ. बाबत संधी उपलब्ध करुन घेणे व त्यांना संस्थेसाठी Knowledge Partner म्हणून संलग्न करण्यासाठी प्रयत्न करणे, व्यावसायिक विषयांचे व्याख्याते व औद्योगिक क्षेत्रातील तज्ञांचे मार्गदर्शन सत्र / कार्यशाळा / समुपदेशन, Industry Expert Session इत्यादींचे आयोजन करणे.
8. औद्योगिक प्रशिक्षण संस्थेस आदर्श प्रशिक्षण संस्था (Model ITI) म्हणून दर्जावाढ (Upgradation) करण्यासाठी प्रयत्न करणे. तसेच औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या इमारतीचे नविन बांधकाम / नूतनीकरण / अद्ययावतीकरण करण्याकरीता व त्याठिकाणी नविन व्यवसाय अभ्यासक्रम सुरु करण्याकरीता आवश्यक त्या औद्योगिक आस्थापना, यंत्रसामुग्री / उपकरणे साहित्य पुरवठादार यांच्याशी समन्वय साधून पत्रव्यवहार करुन आवश्यकतेनुसार बैठका किंवा वर्कशॉपचे आयोजन व नियोजन करुन CSR/VD अथवा इतर माध्यमातून त्यांचे

सहकार्य मिळविणे. तसेच केंद्र शासनाच्या वेब पोर्टल वर नवीन ट्रेडस सुरु करणेबाबत आवश्यक ती संपूर्ण कार्यवाही करणे.

9. शासनाच्या निर्देशाप्रमाणे संस्थेमध्ये स्किल सेंटर (Skill Centre) सुरू करणे व त्याचे प्रत्यक्षात अंमलबजावणीकरीता संपूर्ण नियोजन करणे. तसेच कौशल्य स्पर्धा (Skill Competition), तंत्रप्रदर्शन (Technical Exhibition), Global Exposure Program आयोजित करणे.

10. तांत्रिक प्रगती / आधुनिकीकरण व औद्योगिक आस्थापनांच्या बदलत्या गरजेनुसार कुशल मनुष्यबळाच्या मागणीचा विचार करता संस्थेमध्ये Centre of Excellence, Advanced Lab Development, Research and Development इ. औद्योगिक आस्थापना यांच्या सहयोगातून सुरू करणे. भविष्यात मागणी असणा-या कौशल्यावर आधारित अत्याधुनिक प्रयोगशाळांची (Skill Labs) ची निर्मिती करणे.

11. औद्योगिक आस्थापना यांचे मार्गदर्शन व सहकार्य याद्वारे औद्योगिक प्रशिक्षण संस्थेत प्रशिक्षण व प्रशिक्षण सुविधांचा दर्जा वाढविणे. कौशल्य विकास, रोजगार यासाठी आवश्यक असणा-या पायाभूत सुविधा उपलब्ध व विकसित करुन देणे. औद्योगिक आस्थापनांमध्ये काळानुरुप आवश्यक असलेले कौशल्य व प्रशिक्षण आणि संस्थांमध्ये देण्यात येणारे कौशल्य प्रशिक्षण यांच्यामध्ये सुयोग्य सांगड घालून प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार व स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होतील यासाठी विविध उपाययोजना करणे. यासोबतच संस्थेतील निदेशक / गटनिदेशक यांचेकरीता Faculty Development Program आयोजित करणे.

12. प्रशिक्षणार्थ्यांच्या रोजगार व स्वयंरोजगार निर्मितीसाठी प्लेसमेंट सेलची (Placement Cell) निर्मिती करणे व ते संपूर्ण कार्यक्षमतेने चालविण्याकरीता पूर्णवेळ आवश्यक तितके मनुष्यबळ पुरविणे. सर्व आजी-माजी प्रशिक्षणार्थ्यांना रोजगार तथा स्वयंरोजगाराच्या शाश्वत संधी अधिकाधिक प्रमाणात उपलब्ध होण्याकामी विविध औद्योगिक आस्थापना यांचेशी समन्वय साधणे. सर्व प्रशिक्षणार्थ्यांशी ईमेल / दूरध्वनीद्वारे संपर्क ठेवून त्यांना वेळोवेळी रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देणे, प्लेसमेंट झालेल्या उमेदवारांची सर्व प्रकारची माहिती अद्ययावत ठेवणे इ. कामकाजासाठी ठोस पावले उचलणे. रोजगार मेळावे आयोजित करण्यासाठी आवश्यक ते सर्व नियोजन करणे. त्याकामी विविध खाजगी कंपन्या / शासकीय संस्था यांच्याशी समन्वय साधणे व सर्व माहितींचे संकलन करुन अद्ययावत ठेवणे. प्रशिक्षणार्थींकरीता Internship व Apprenticeship उपलब्ध करुन देणे, स्वयंरोजगार सहायता उपक्रम राबवणे तसेच कौशल्य विकास प्रशिक्षणासाठी / पुढील शिक्षणासाठी परदेशी अथवा इतरत्र जावू इच्छिणा-या उमेदवारांसाठी मार्गदर्शन करणे.

13. औद्योगिक आस्थापना / तांत्रिक व अतांत्रिक शैक्षणिक संस्था / क्लस्टर्स / शासकीय संस्था इत्यादींशी समन्वय साधून विविध योजनांचे तसेच संस्था / प्रशिक्षणार्थी यांच्या हिताचे वेगवेगळे प्रकल्प / उपक्रम हाती घेवून त्यांच्याशी आवश्यक तो पत्रव्यवहार, सादरीकरण व सामंजस्य करार (MoU) करणे. त्याकामी धोरणांचा मसुदा बनविणे / आवश्यक माहितीचे संकलन करणे इ. कामकाज करणे. याशिवाय शासकीय विविध योजनांची अमलबजावणी करणेकरीता संपूर्ण नियोजन करणे.

14. औद्योगिक आस्थापना / कॉर्पोरेट संस्था यांच्याशी वेळोवेळी समन्वय साधून, केंद्र / राज्य शासन यांच्या विविध योजना व उपक्रम , Social Initiatives तसेच संस्थेच्या हितासाठी हाती घेण्यात येणारे विविध उपक्रम याकामी संबंधितांबरोबर बैठकांचे / भेटीचे आयोजन, सादरीकरण (Presentation) व त्यात घेतलेल्या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी आवश्यक ती कार्यवाही करणे.

15. कार्यालयीन अधिकारी / कर्मचारी, गटनिदेशक/ निदेशक (Instructor), प्रशिक्षणार्थी इ. साठी प्रशिक्षण उपक्रमाच्या दृष्टीने आवश्यक असे अभ्यास दौरे (इतर राज्ये / परदेशासह), औद्योगिक

आस्थापनांना भेटी (Industrial Visit), कार्यशाळा, परिषदा, एक्सेंज, व्यक्तिमत्व विकास शिबिर, Soft Skill Training Program, Event Arrangement, Field / Exposure, इ. उपक्रम / कार्यक्रमांचे आयोजन व नियोजन करणे.

16. औद्योगिक आस्थापना/ क्लस्टर्स इत्यादींच्या माध्यमातून Startups, Incubators, Researchers (Startup Parks, Exhibition, Mini Incubators) याचा संस्थेसाठी पुरेपूर वापर करुन घेणे.
17. औद्योगिक आस्थापनांमध्ये प्रशिक्षणार्थ्यांसाठी On Job Training (OJT) आयोजित करुन त्याची योग्यप्रकारे अंमलबजावणी करणे. शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे DST Scheme बाबत कार्यवाही करून औद्योगिक अस्थापना समवेत DST MoU करार करणे.
18. Model Career Centre (MCC) व Career Guidance & Counseling Centre (CGCC) तयार करणे आणि तदनंतर व्यवस्थापनासाठी आवश्यक आर्थिक मदत उपलब्ध करण्यासाठी कार्यवाही करणे.
19. वरील कामांच्या व्यापक प्रसिध्दीकरीता वेळोवेळी प्रेसनोट व सोशल मिडिया यांचे माध्यमातून आवश्यक ती कार्यवाही करणे.
20. उपरोक्त नमूद कामे व भविष्यात औद्योगिक प्रशिक्षण विभागाच्या गरजेनुसार निर्माण होणारी इतर कामे व्यवस्थितरित्या पार पाडणे.

अति. आयुक्त (३)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – १८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
औद्योगिक प्रशिक्षण विभाग

औद्योगिक प्रशिक्षण विभागात कौशल्यवृध्दी करण्याकरीता सल्लागार संस्थेची नियुक्ती करणेकामी निकष

'प्रपत्र – अ'

| औद्योगिक प्रशिक्षण विभागात कौशल्यवृध्दी करण्याकरीता सल्लागार संस्थेची नियुक्ती करणेकामी इच्छुक संस्थांकरीता निकष | सर्व निकषांच्या अनुषंगाने इच्छुक संस्थांकडून आकारले जाणारे शुल्क सर्व करांसहित एकत्रितपणे नमूद करावे |
|---|---|
| इच्छुक संस्थांनी सविस्तर माहितीमध्ये दिलेली कामे/ निकष (अ.क्र. 1 ते 20) | |

(संस्था / आस्थापना नाव)
सही व शिक्का

(टिप :- बंद पाकीट क्र.१ मध्ये इच्छुक संस्थेने अ.क्र. १ते ४ च्या अनुषंगाने नोंदणी प्रमाणपत्र व सबळ पुरावे सादर करावे तसेच सदर 'प्रपत्र –अ' हे व्यवस्थित भरुन स्वतंत्र बंद पाकिट क्र.२ मध्ये सिलबंद करुन सादर करावे)

अति. आयुक्त (३)
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी – ४११ ०१८